# एकची विसावा

ज्ञानदेव नामा तुका
एकनाथ नरसी चोखा
सखू जनी मुक्ता मीरा
रामदास कबीर गोऱ्हा

संत भक्त मेळा मोठा
तेथे काय पाड माझा
तरी करी हरी कृपा
वदवी गोड अमृत नामा

पंढरी निवासी सावळा विठोबा
भोळया भाबड्या भक्तांचा एकची विसावा

थको भागो मोडो तन
चळो जळो चंचल मन
उच्चारीता विठू नाम
शांती मना तना आराम

पंढरी निवासी सावळा विठोबा
भोळया भाबड्या भक्तांचा एकची विसावा

-नारायण
११/०७/११